# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी – 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स – 22692102.

E-mail : desk10@dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharashtra.gov.in

परिपत्रक

क्रमांक : १०/एनजीपी/वि.आ./२०१८/ २२१

दिनांक : - 5 MAR 2018

विषय : तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील व्यावसायिक तंत्रशिक्षण अभ्यासक्रमांच्या संस्थामध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आत्महत्या प्रकरणी प्रतिबधंक उपाय योजना करण्याबाबत....

तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील व्यावसायिक तंत्रशिक्षण अभ्यासक्रमांच्या संस्थामध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांने आत्महत्या केल्याबाबतच्या बातम्या प्रसारमाध्यमे व विभागीय कार्यालय स्तरावरुन संचालनालयास निदर्शनास आलेले आहे.

तरी, सदर बाबत सर्व तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये तसेच तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील व्यावसायिक तंत्रशिक्षण अभ्यासक्रमांच्या संस्था यांना सदर परिपत्रकान्वये असे कळविण्यात येते आहे की, सर्व संस्थामध्ये संस्था प्रमुख/ प्राचार्य स्तरावरुन संस्थेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचे मनोबल वाढविण्याच्या दृष्टीने जाणीव पुर्वक प्रयत्न करण्यात यावेत. तसेच विद्यार्थ्यांना समुपदेशन करण्यासाठी तज्ञ व्यक्तींचे व्याख्यान आयोजित करुन विद्यार्थ्यांचे मनोबल वाढविण्याबाबतही प्रयत्न करावेत.

(डॉ. सुभाष महाजन)
सहसंचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई.

प्रत: माहिती व पुढील कार्यवाहीकरीता.(संचालनालयाच्या संकेत स्थळावरुन)

१. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती/ औरंगाबाद/ मुंबई/ नागपूर/ नाशिक/ पुणे, यांना ईमेलव्दारे.
२. कार्यासन क्रमांक ३, आयटी सेल, मुख्य कार्यालय, मुंबई, यांना संचालनालयाच्या सकेंतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.
३. कार्यासन क्रमांक २ व २ अ, मुख्य कार्यालय, मुंबई, यांना माहितीसाठी.